# भरती प्रकिया – २०२३

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

संदर्भ :– जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग नोटीस दि.२५/०७/२०२४

## सूचना

जिल्हा न्यायालय भरती प्रक्रिया २०२३ मधील लघुलेखक (ग्रेड–३) या पदाचे भरती प्रक्रियोकरीता दिनांक २३/०७/२०२४ रोजी घेणेत आलेल्या इंग्रजी लघुलेखन व दिनांक २४/०७/२०२४ रोजी घेणेत आलेल्या मराठी लघुलेखन परीक्षेद्वारे, मराठी टंकलेखन परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी दिनांक २६/०७/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रसिध्द करणेत येणार होती. तथापि, ना.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून आज रोजी दूरध्वनीद्वारे प्राप्त निर्देशानुसार भरती प्रक्रियेची पुढील कार्यवाही दिनांक १०/०८/२०२४ पर्यंत पुढे ढकलणेत आलेली आहे. ना.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून निर्देश प्राप्त झालेनंतर सुधारित वेळापत्रक जिल्हा न्यायालयाच्या सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

तसेच उमेदवारांनी जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग चे संकेतस्थळावरील सूचनांची नियमितपणे पाहणी करावी व त्याबाबत काही माहिती हवी असल्यास दूरध्वनी क्र. ०२३६२–२२८७८८ या नंबरवर संपर्क साधावा.

26/7/2024

( एच्. बी. गायकवाड )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग.
दिनांक :– २६/०७/२०२४.